**(सभापतीस्थानी - माननीय सभापती)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विधान परिषद नियम 289 व 93 च्या प्रस्तावासंबंधी</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, विधान परिषद नियम 289 व 93 अन्वये सर्व कामकाज बाजूला सारुन 11 जुलै 2006 रोजी मुंबई शहरात झालेल्या बॉम्बस्फोटाविषयी सभागृहात चर्चा घ्यावी, अशा प्रकारची सूचना आम्ही दिलेली आहे.

सभापती महोदय, आम्ही दिलेली नियम 93 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना अशी आहे की, "दि.11 जुलै, 2006 रोजी मुंबई शहरामध्ये चर्चगेट ते विरार या पश्चिम रेल्वेच्या मार्गावर 7 विविध लोकल गाडयांमध्ये आठ विविध ठिकाणी बॉम्बस्फोट होणे, आणि ज्या अर्थी, 7 दिवस होऊनही सदर बॉम्बस्फोट प्रकरणी चौकशी करुन आरोपींची वा संबंधीत संघटनेची संशयीत म्हणून नावे जाहीर करण्यात वा संशयीतांना अटक करण्यात शासनाला आलेले दारुण अपयश, आणि ज्याअर्थी, राज्याचे पोलीस अधिकारी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी यांनी विविध स्वरुपाची विधाने करुन अफवा पसरविणे व तपास कार्यात निर्माण केलेला गोंधळ, आणि ज्याअर्थी, सन्माननीय पंतप्रधान यांनी बॉम्बस्फोट प्रकरणी दि.14 जुलै 2006 रोजी मुंबईला भेट दिली असता संबंधीत बॉम्बस्फोट घडणार असल्यासंदर्भात केंद्र शासनाच्या गुप्तचर यंत्रणेने दिनांक 27 जून 2006 रोजी राज्य शासनाला कळविले असल्याबाबतचे निदर्शनास आणून देणे, आणि ज्याअर्थी, राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहातील चर्चेच्या उत्तरामध्ये केंद्र शासन माहिती कळवित नाही म्हणून केंद्र सरकारला जबाबदार धरणे आणि ज्याअर्थी, गेल्या 7 दिवसात या घटनेचा तपास लागू न शकल्याने तपासाची खरी परिस्थिती कळण्याची निर्माण झालेली आवश्यकता, आणि ज्याअर्थी, या घटनेमुळे राज्याचे पोलीस अधिकारी करीत असलेली विविध विधाने, पंतप्रधानांनी राज्य सरकारला जबाबदार धरणे, उपमुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनावर जबाबदारी ढकलणे, यामुळे शासन ठोस कारवाई करणार की नाही याचा जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम व चिंता, आणि शासनाच्या कर्तव्यशून्य कारभाराबद्दल शंका व्यक्त होणे, आणि त्याअर्थी या तातडीच्या व व्यापक सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी नियम 93 अन्वये चर्चा घेण्यात यावी."

..2......

SRR/ KGS/ MAP/

श्री.पांडुरंग फुंडकर..........

सभापती महोदय, दिनांक 11 जुलै 2006 रोजी मुंबईमध्ये संध्याकाळी 6 च्या सुमारास जे 7 बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये 200 माणसे मृत्युमुखी पडली व 700 माणसे जखमी झाली. या घटनेमुळे सर्व मुंबईमध्ये हाहा:कार उडाला. "बॉम्बस्फोटाचा ताबडतोबीने तपास लावला जाईल", अशा प्रकारचे वक्तव्य या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी केले होते. अशा प्रकारचे वक्तव्य केल्यानंतर आज 7 दिवस होऊन गेले आहेत. या दरम्यान केंद्रीय गृहमंत्र्यांनी मुंबईला भेट दिली व त्यांनी पत्रकारांसमोर असे वक्तव्य केले की, "यासंबंधीची माहिती केंद्र सरकारने राज्य सरकारला 6 महिन्यांपूर्वी दिली होती." यासंदर्भात केंद्र सरकारने राज्य सरकारला असे कळविले होते की, गुप्तचर विभागाला माहिती मिळाली आहे. राज्य सरकारला असे कळविल्यानंतर सुध्दा हे सरकार अतिरेक्यांचा शोध घेऊ शकली नाही. परिणामी अतिरेक्यांनी अशा प्रकारचा बॉम्बस्फोट घडवून आणला. सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्र्यांनी यासंबंधी असे वक्तव्य केले होते की, "या घटनेचा ताबडतोबीने छडा लावला जाईल." आज या वक्तव्याला 7 दिवस झाले आहेत. या दरम्यान या देशाचे पंतप्रधान मुंबईत येऊन गेले आणि त्यांनीही या सरकारला दोष दिला. त्यांनी असे वक्तव्य केले होते की, "केंद्रीय गुप्तचर विभागाने राज्य सरकारला कळविले होते." 27 जून रोजी राज्य शासनाला अशा प्रकारची माहिती केंद्रीय गुप्तचर विभागाने दिल्यानंतर सुध्दा राज्य सरकारने काहीही केलेले नाही.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ........ 14:05

श्री.पांडुरंग फुंडकर ........

बॉम्बस्फोट झाल्यानंतर मात्र वेगवेगळया स्तरावरुन वेगवेगळया प्रकारचे स्टेटमेंट येत आहे. राज्याचे गृहमंत्री वेगळे बोलतात, माननीय मुख्यमंत्री वेगळे बोलतात, पोलीस महासंचालक वेगळे बोलतात, माननीय पंतप्रधान वेगळे बोलतात, केंद्रीय गृहमंत्री वेगळे बोलतात. त्यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर अफवा पसरत आहेत. आजच्या वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, "आता अतिरेक्यांचे टारगेट लोकल नाही तर आता अतिरेक्यांचे टारगेट बेस्ट बसेस आहेत, मॉल आहेत, सिनेमागृहे आहेत" अशा प्रकारच्या अफवा मुंबईमध्ये पसरत आहेत. यामुळे जनतेमध्ये घबराटीचे वातावरण पसरलेले आहे. सभापती महोदय, दुसरी बातमी अशी आहे की, या बॉम्बस्फोटाचा तपास मुंबई पोलीस करणार आहेत ? महाराष्ट्र पोलीस करणार आहेत ? का रेल्वे पोलीस करणार आहेत ? यासंबंधी संभ्रम आहे. पोलीस महासंचालक सांगतात की, मुंबईचे पोलीस तपास करतील आणि माननीय मुख्यमंत्री सांगतात की, हे रेल्वे पोलिसांचे काम आहे. बॉम्बस्फोट 7 दिवसापूवी झाले. परंतु बॉम्बस्फोटाचा तपास कोण करणार आहे ? हे अद्याप निश्चित झालेले नाही. बॉम्बस्फोटाचा तपास सुरु झाला नसेल तर आपण जनतेला दिलासा कसा देणार ? सभापती महोदय, भिवंडीच्या दंगलीसंबंधी राज्याच्या पोलीस महासंचालकांनी अशा प्रकारचे वक्तव्य केले की, "यामध्ये राजकारणातील काही मंडळींचा समावेश आहे आणि ते हे घडवून आणू पाहत आहेत." यामुळे संभ्रमाची अवस्था निर्माण झालेली आहे. जात्यांध मुस्लीम लिडर अबू आझमी यांनी सरकारला धमकी दिली आहे. मुस्लिमांना राज्यामध्ये टारगेट केले जात आहे आणि ही चिडवणूक किती सहन करावयाची, असा त्यांनी सरकारला आणि पोलिसांना दम भरला आहे. एक जात्यांध व्यक्ती राज्याच्या 10 कोटी जनतेच्या गृहमंत्र्यांना दम भरुन मुस्लिमांवरील अत्याचार थांबवा नाही तर संयम सुटेल आणि मुस्लीम रस्त्यावर उतरतील असे राज्य सरकारला चॅलेंज करीत आहे, तरी देखील या व्यक्तीला पकडले जात नाही. अशा प्रकारचे वक्तव्य पत्रकार परिषदेमध्ये दिले जाते यामुळे महाराष्ट्रामध्ये अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे. सभापती महोदय, बॉम्बस्फोट झाल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवर सभागृहामध्ये चर्चा करुन राज्यातील 10 कोटी जनतेला दिलासा देण्याची गरज आहे, मुंबईच्या जनतेला दिलासा देण्याची गरज आहे. म्हणून मी विधान परिषद नियम 289 अन्वये सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करावे आणि या संपूर्ण परिस्थितीवर चर्चा करावी अशी मागणी केली आहे.

...2/-



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ........ 14:05

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): सभापती महोदय, अत्यंत व्यथित मनाने आम्हाला हा प्रस्ताव मांडावा लागत आहे. 10 तारखेला स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाला चिखल फासला गेला. त्याची प्रतिक्रिया संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शिवसेनेतर्फे उमटली, ही वस्तुस्थिती आहे. त्यावेळी आम्ही सभागृहामध्ये भूमिका मांडली होती आणि दुस-या दिवशी 11 तारखेला मुंबई शहरामध्ये प्रचंड प्रमाणावर बॉम्बस्फोट झाले. त्यामध्ये 200 लोक मृत्यूमुखी पडले. 715 लोक जखमी झाले. एवढा मोठा प्रसंग घडल्यानंतर पोलिसांना आज पर्यंत त्यातील एकही संशयीत सापडत नाही, हे महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाचे यश आहे की अपयश आहे याचा फैसला होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 14:10

श्री. सरपोतदार ....

ही काही नवीन घटना नाही. पूर्वीचादेखील अनुभव आहे. हे सगळे माहीत असताना त्यातील जे गुन्हेगार आहेत त्या सगळ्यांचे रेकॉर्ड पोलीस खात्याकडे असतानाही पोलिसांनी जी याबाबतीत सतर्कता बाळगावयास पाहिजे होती ती बाळगली गेली नाही. मागील आठवड्यामध्ये भिवंडीमध्ये जी घटना घडली त्यामध्ये शासकीय जमिनीवर शासनाच्या खर्चाने बांधली जाणारी पोलीस चौकी, तेथील काही मुसलमानांचा समुदाय येऊन दगडफेक करून काम थांबवितो, इतकेच नाही तर पोलिसांवर हल्ला करून दोन पोलिसांना ठेचून मारले जाते, त्यांचे तुकडे केले जातात. पोलिसांनी त्या समुदायावर गोळीबार केला असता त्यामध्ये दोन मुस्लिम तरूण मारले गेले ही वस्तुस्थिती आहे. पण अशा प्रकारे पोलीस चौकीवर, पोलिसांवर हल्ला होत असेल, व ज्या पोलिसांनी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सांभाळावयाची त्या पोलिसांच्या जीवावर बेतले गेले तर त्या पोलिसांनी तरी काय करायचे ? सभापती महोदय, आज जम्मू-काश्मिरमध्येदेखील हीच परिस्थिती आहे. मुंबईमध्ये देखील आता जम्मू-काश्मिरसारखी परिस्थिती करण्याचा अतिरेक्यांचा प्रयत्न आहे. या अतिरेक्यांनी जो काही गोंधळ या महाराष्ट्रात आणि या मुंबईत घातला आहे तो भयानक आहे. या महाराष्ट्रात बॉम्बस्फोटाचे साहित्य पकडले गेले. आरडीएक्स, शस्त्रास्त्रे पकडली गेली, माणसे पकडली गेली आणि त्या सगळ्यांचा उद्देश इतका भयानक होता आणि तो लक्षात घेऊन त्यांच्या माध्यमातून खरे म्हणजे पोलिसांनी त्याच्या मूळाशी जायला पाहिजे होते की, या साऱ्याच्या पाठीमागे ब्रेन कोणाचा आहे ? पण तसे झाले नाही. हे विध्वंसक साहित्य मिळाल्यानंतर पोलिसांची कारवाई थांबली गेली परिणामी त्यामागील गुन्हेगारांचा शोध गतीने लागला नाही. त्यामुळे 11 तारखेला, मंगळवारी, या मुंबईमध्ये एकामागोमाग एक बॉम्बस्फोट झाले, अनेक निरपराध माणसे त्यात मारली गेली. मुंबईमध्ये एक प्रकारे लॉलेसनेसची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील जनतेला दिलेली ही फार मोठी देणगी आहे. या राज्यात कायदा व सुव्यवस्थाच राहिलेली नाही. राज्याचे गृहमंत्री येतात, बोलतात एक आणि कृती करतात दुसरीच अशी परिस्थिती झालेली आहे. त्या दिवशी राज्याच्या गृहमंत्र्यांनी या सदनातच सांगितले होते की, 7 दिवसात आम्ही भिवंडीमध्ये त्याच ठिकाणी पोलीस चौकी बांधण्यास परवानगी देऊ. पण आज 7 दिवसांनंतर अद्यापही तेथे पोलीस चौकीचे काम सुरू झालेले नाही. कोण अबू आझमी ? ज्याने भिवंडीमधून निवडणूक लढविली होती पण तेथील जनतेने त्याचे डिपॉझिट जप्त करायला लावले.

...... सी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण नियम 289 खाली जी सूचना दिली आहे ती कशी स्वीकारार्ह आहे तेवढेच आपण सांगावे ... परवाच्या दिवशी या सदनामध्ये बॉम्बस्फोटांसंबंधात सविस्तर चर्चा झालेली आहे. ...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियम 289 खाली आम्ही सूचना दिलेलीच आहे पण शिवाय नियम 93 खाली देखील आम्ही सूचना दिलेली आहे एवढा हा गंभीर विषय आहे. तरीही आपणास मी या संबंधात बोलू नये असे वाटत असेल तर मी येथेच थांबतो. ..

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी हे लक्षात घ्यावे की, मी आपणास बोलण्याची परवानगी दिली आहे याचा अर्थ आपण नियम 289 खाली दिलेली सूचना कशी योग्य आहे या बाबत थोडक्यात बोलावे. .. आपण म्हणता त्याप्रमाणे हा विषय गंभीर आहे हे मान्य. पण याच विषयावर आपण 12 तारखेला 6 तास चर्चा येथे केलेली आहे. ...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, तरीही या घटना घडतातच आहेत. या घटना घडावयाच्या थांबल्या कोठे ? या संबंधात राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे एक स्टेटमेंट आहे तर राज्याच्या गृहमंत्र्यांचे, सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांचे स्टेटमेंट दुसरेच आहे. राज्याच्या पोलीस महासंचालकांचे स्टेटमेंट आणखी वेगळेच आहे तर मुंबईच्या पोलीस आयुक्तांचे स्टेटमेंट तिसरेच आहे. या कोणाच्याही स्टेटमेंटमध्ये ताळमेळ नाही. केंद्राचे गृहमंत्री एक सांगतात, माननीय पंतप्रधान दुसरेच बोलतात आणि प्रत्यक्षात घटना अशा घडतात की, बॉम्बस्फोट होऊन आज सातवा आठवा दिवस उजाडला आहे पण अजून एकही आरोपी पोलिसांना मिळालेला नाही. या संबंधात महाराष्ट्र शासन म्हणते की, ही जबाबदारी रेल्वेची आहे तर रेल्वे म्हणते ही महाराष्ट्र शासनाच्या पोलिसांची जबाबदारी आहे. पण घडणाऱ्या घटनांमध्ये मात्र निरपराध माणसे मारली जात आहेत आणि त्यांचे मारेकरी मोकाट सुटलेले आहेत. नुसत्या अफवा उठताहेत, त्यामुळे रेल्वे गाड्या थांबवून ठेवाव्या लागत आहेत आणि त्यात लोकांचे जे काही हाल होतात ते आम्हाला त्या भागामध्ये आम्ही राहात असल्यामुळे आम्हाला पहावयास मिळतात आणि ते पाहिले असल्यानेच आम्ही ते येथे मांडण्यासाठी सभागृहात बोलतो. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

खरे म्हणजे माननीय गृहमंत्र्यांनी या परिस्थितीवर वचक बसवून ठोस पावले उचलायला पाहिजे होती, ती पावले त्यांनी आतापर्यंत उचलली नाहीत. या संदर्भात नुसतीच चर्चा चालू आहे. परंतु यामधून हा प्रश्न सुटेल अशाप्रकारची पोलीस ॲक्शन होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे पोलिसांमध्ये देखील आपापसात मतभेद आहेत. कुणीही त्या अे.टी.एस.. डिपार्टमेंटमध्ये जाण्यास तयार नाही. कुणाला अधिकारी नेमावयाचे आहे, कुणाला नेमावयाचे नाही. जुने अधिकारी नेमावयाचे की, नवीन अधिकारी नेमावयाचे याची कुणालाही कल्पना नाही. अशा या परिस्थितीमध्ये महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था मधल्यामध्ये लोंबकळत आहे. या अवस्थेला जबाबदार कोण आहे? जी निरपराध माणसे मेली त्यांची कसूर काय? या सर्व बाबींवर चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन आपण चर्चा घडवून आणली पाहिजे. हा प्रस्ताव देण्यामागील उद्देश एकच आहे की, हे प्रश्न या सदनामध्ये चर्चेला यावेत आणि त्यामधून नवनवीन मार्ग माननीय गृहमंत्र्यांनी शोधून काढावेत. आणि जे सर्व प्रकार चालू आहेत ते बंद करण्यासाठी जे दोषी असतील त्यांना सजा देण्यात यावी. आणि जे निर्दोष आहेत, जे हकनाकपणे प्राणाला मुकत आहेत, ते प्राणाला मुकू नयेत ही आपली जबाबदारी असल्यामुळे त्या उद्देशाने हा नियम 289 अन्वये प्रस्ताव व नियम 93 अन्वये सूचना दिली आहे . या अनुषंगाने प्रामुख्याने श्री. अबू आझमी यांच्यासंबंधी आपल्याला चर्चा करावयाची आहे. त्यांनी आपल्याला धमकी दिली आहे की, जर तुम्ही मुसलमानांना टारगेट केले तर या देशातील 20 कोटी मुसलमान रस्त्यावर उतरतील. हा काय प्रकार आहे? अशाप्रकारे श्री. अबू आझमी हे काहीही बोलत आहेत, कुणालाही आव्हान करीत आहेत. त्यांनी शिवसेनेच्या शाखेवर जाऊ असे सांगितले आहे. मी श्री. अबू आझमी यांना सांगू इच्छितो की, शिवसेनेच्या शाखेची दारे सर्वांसाठी खुली आहेत. आपण जर त्याठिकाणी गेलात तर आमचे शिवसैनिक आपले चांगल्याप्रकारे स्वागत करतील. शेवटी आव्हानाला प्रति आव्हान करणे हा आमचा उद्देश नाही. परिस्थिती शांत होऊन निरपराध माणसे मारली जाणार नाहीत हे पहाण्याची शासनाची जबाबदारी आहे, आणि शासन ती पार पाडणार आहे की नाही? आणि शासन जर पार पाडणार नसेल तर जनतेनेच त्याबाबतीत पुढाकार घ्यावा,आणि हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा हा त्याच्या पाठीमागचा उद्देश आहे. माननीय उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये बसले आहेत, त्यांच्याकडे गृहखाते आहे. गेल्या आठ दिवसामध्ये ज्या घटना घडल्या आहेत त्या सांगण्याची जबाबदारी त्यांची आहे. या प्रकरणामध्ये एवढी व अशाप्रकारची प्रगती झाली आहे असे त्यांनी स्वत:हून या सदनामध्ये सांगितले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

असे जर घडले असते तर आम्हाला हा प्रस्ताव सभागृहामध्ये आणण्याची गरज नव्हती. दुर्दैवाने ही माहिती सभागृहापुढे येत नाही. त्यामुळे कुठेतरी आयुधांचा वापर करुन ही माहिती आम्हाला शासनाकडून घ्यावी लागते हे आमचे दुर्दैव आहे. हे सभागृहामध्ये सांगण्यामध्ये चूक आहे असे मला वाटत नाही. शेवटी आम्ही जनतेचे प्रतिनिधीत्व करतो, त्यामुळे तुम्ही आम्हाला संरक्षण द्यायचे नाही तर आम्ही संरक्षण कुणाकडे मागावयाचे? आम्ही माननीय गृहमंत्र्यांकडे संरक्षण मागू शकत नाही. त्यामुळे हा विषय ज्वलंत, गंभीर व तातडीचा असल्यामुळे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेऊन या विषयावर चर्चा करण्याची आवश्यकता आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेऊन या विषयावर चर्चा करुन काहीतरी मार्ग काढावा. आणि त्या अनुषंगाने आमच्याकडील सूचना आणि त्यांच्याकडील सूचना एकत्र करुन आपण पुढे पाऊल टाकावे आणि या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करावी अशी विनंती करतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,...

**सभापती** : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे प्रथम बोलतील...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नियम असा आहे की, ज्या माननीय सदस्यांनी प्रस्तावावर सही केलेली आहे त्यांना प्रथम बोलण्याचा अधिकार आहे. ज्यांनी प्रस्तावावर सही केलेली नाही त्यांना बोलण्याचा अधिकार नाही. तरीसुध्दा आपण माननीय सदस्यांना बोलू द्यावे...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या सभागृहामध्ये प्रस्ताव दिला असला तरी तो प्रस्ताव एकदा सभागृहापुढे आल्यानंतर ती सभागृहाची मालमत्ता होते. त्यामुळे माननीय सदस्य मला बोलू नका असे सांगू शकत नाहीत, या प्रस्तावावर मला देखील बोलण्याचा अधिकार आहे...

**सभापती** : माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी मी आपणास नंतर बोलण्याची संधी देईन.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना जरुर बोलू द्यावे आणि त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी नियम 289 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करुन तातडीने काही महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा करावी अशाप्रकारची विनंती केली आहे. ही चर्चा कां करण्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

यावी, याकरिता नियम 289 अन्वये त्यांनी काही रेफरन्स दिले आहेत. त्या दृष्टीकोनातून राज्यामध्ये परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे त्या अनुषंगाने सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करणे आवश्यक झ ाले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 14:20

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु..

सभापती महोदय, 11 जुलै रोजी जी घटना घडली त्या संदर्भात या सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झालेली आहे. पण 11 जुलै नंतर या राज्यातील काही जबाबदार लोकांनी वक्तव्ये केलेली आहेत, त्यातून या राज्यातील जनतेसमोर नवीन प्रश्न आणि संभ्रमाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेर सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी अशाप्रकारची इंटीलिजन्सकडून माहिती मिळाली नव्हती, असे सांगितले. केंद्रीय गृह मंत्री श्री.शिवराज पाटील हे या ठिकाणी आले असताना त्यांनी सांगितले की, "सहा महिन्यापूर्वीच अशाप्रकारची माहिती राज्य सरकारला दिलेली होती", त्यानंतर प्रधानमंत्री या ठिकाणी आले, त्यांनी देखील हेच वक्तव्य रिपीट केले. सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी वर्तमानपत्रांना दिलेल्या मुलाखतीमध्ये "आमच्या शासनाला याची कल्पना होती",असे सांगितलेले आहे. म्हणजे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब म्हणतात की, आम्हाला याची कल्पना नव्हती आणि मुख्यमंत्री म्हणतात की, याची आम्हाला कल्पना होती. आता मंत्रिमंडळामध्ये नवीन मंत्री श्री.राणे साहेब आले, ते तिसरे सुपर मुख्यमंत्री आहेत, त्यांनी त्याबाबत काही सांगितले नाही. माझे असे म्हणणे आहे की, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांच्यामध्ये समन्वय नाही, राज्य सरकार आणि केंद्र सरकारमध्ये समन्वय नाही. माजी पोलीस आयुक्त एम.एन. सिंग यांनी तर "याला मुंबईचे पोलीस अधिकारी जबाबदार असल्या"चे म्हटलेले आहे. गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना "मौनाचे फायदे", नावाचे एक पुस्तक आहे, ते मी त्यांना वाचावयास देतो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या बाहेर कोणी काय चर्चा केली, श्री.एम.एन.सिंग, यांनी काय सांगितले, यांचा देखील सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीचा आधारावर या ठिकाणी कोणाचे नाव घेऊन येथे उल्लेख करणे, बरोबर नाही. असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांचे वक्तव्ये तपासून,त्यामध्ये काय योग्य आणि काय अयोग्य आहे ते मी नंतर ठरवेन.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्यांनी सरकारी वकिलासारखे वागू नये, त्यांनी खाजगी वकिलासारखे वागावे. श्री.एम.एन.सिंग, सेवानिवृत्त पोलीस आयुक्त आहेत त्यांनी वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट दिलेले आहे इसहध्स ते गंभीर आहे. राज्य सरकारने माजी पोलीस



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

आयुक्त श्री.एम.एन.सिंग यांची मुंबई पोलीस आयुक्त पदावर नियुक्ती केलेली होती. त्यांनी आरोप केलेला आहे की, "याला मुंबईचे पोलीस अधिकारी जबाबदार आहेत.." म्हणून माझे म्हणणे आहे की,गृहमंत्री महोदयांनी याबाबतची काळजी घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आपण सरकारी वकिलासारखे वागू नका, खजगी वकिलासारखे वागा.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मला उद्देशून बोलावे.

श्री.नितीन गडकरी : या सगळ्यांची वक्तव्ये पहाता, जनतेच्या मनामध्ये संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे. गृहमंत्र्यांना त्यांच्याच राष्ट्रवादी पक्षामधील लोकांनी आणि काँग्रेसच्या लोकांनी लक्ष्य केलेले आहे. प्रधानमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री या ठिकाणी येऊन गेले, त्यांनीही त्यांना लक्ष्य केलेले आहे, ही परिस्थिती चांगली नाही. पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय आणि पोलीस महासंचालक श्री.पसरीचा या दोघांमध्ये बोलणे-चालणे नाही,असे ऐकावयास मिळते.. पोलीस महासंचालक श्री.पसरीचा यांनी यामध्ये 'राजकीय नेत्यांचा हात असल्या'चे म्हटलेले आहे. आता पोलीस कॉन्स्टेबलनी "एनडी" टी.व्ही. आणि "झी" टी.व्ही.वर येऊन काही सांगावे, अशी परिस्थिती निर्माण झ ालेली आहे. वेगवेगळया चार तोंडांनी वक्त्यव्ये केली जात असल्यामुळे लोकांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. कन्व्हीन्स करता येत नाही, म्हणून कन्फ्युजन निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. मिडिया समोर मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री हे वेगवेगळे बोलत आहेत....

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

या सेन्सिटिव्ह बाबीच्या संदर्भात राज्य सरकारची एक भूमिका नको काय ? या सेन्सिटिव्ह बाबीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यंत्री यांची एक भूमिका नको काय ? या सेन्सिटिव्ह बाबीच्या संदर्भात केंद्र सरकार आणि राज्य सरकारची एक भूमिका नको काय ? या सेन्सिटिव्ह बाबीच्या संदर्भात माननीय गृहमंत्री आणि पोलीस अधिकाऱ्यांची एक भूमिका नको काय ? या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर हा जो संभ्रम निर्माण झालेला आहे त्यामुळे आमचे जीवन धोक्यात आले आहे. आमदार निवासमध्ये आतंकवादी घुसले. आमची घरे असुरक्षित आहेत. आमचे अनेक नेते बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडलेले आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल मला बोलावयाचे नाही पण आमच्या भारतीय जनता पक्षाचे आणि शिवसेनेच्या अनेक नेत्यांचे बळी गेले. आमचे जीवन असुरक्षित आहे. श्री. अबू आझमी सांगतात की, 20 कोटी मुसलमान रस्त्यावर येतील. माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर तुम्ही खटला घातला. श्री. अबू आझमी यांनी जे वक्तव्य केले त्याबद्दल त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची शासनाची हिंमत आहे काय ? भिवंडीच्या बाबतीत काय झाले ? आठ दिवसात कारवाई करु असे सांगितले होते. त्याबाबतीत काहीही निर्णय घेतला नाही. बाहेर परिस्थिती चिंताग्रस्त आहे. त्यामुळे सभागृहाचे बाकीचे सर्व कामकाज स्थगित करुन आपण या सभागृहात ताबडतोबीने या प्रस्तावावरील चर्चेला परवानगी द्यावी. या सगळ्यात महत्वाच्या विषयावर चर्चा होणे हे राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असल्यामुळे आपण सभागृहाचे इतर सर्व कामकाज थांबवावे आणि ही चर्चा घ्यावी अशी मी विनंती करतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेऊन या विषयावर चर्चा करावी असा प्रस्ताव दिलेला आहे. त्यावर चर्चा होऊ नये अशी या बाजूच्या कोणाचीही हरकत नाही. 11 तारखेला मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले. 10 तारखेला शिवाजी पार्क येथे स्व. मीनाताई ठाकरे यांच्या .....

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पहिली बाब अशी की, आपल्या प्रथेप्रमाणे नियम 93 ची किंवा नियम 289 ची जी सूचना असते त्याला विरोध आणि समर्थन असे काही होत नसते. जे सन्माननीय सदस्य सही करुन आपल्याकडे प्रस्ताव पाठवितात त्यांना आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार मिळतो. दुसरी बाब अशी की, आपल्या प्रथेप्रमाणे मी सत्ताधारी पक्षाला असे विचारतो की, या विषयावर चर्चा करण्याची तयारी आहे काय ? या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील, माननीय मंत्रिमहोदय श्री. अजित पवार तसेच अन्य मंत्रिमहोदय, शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित आहेत. सभागृहाचे नेते श्री. आर. आर. पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत. या विषयावर सभागृहात चर्चा करावयाची की, नाही याबाबत माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील चर्चेला तयार असतील तर ते सांगतील की, आमची चर्चेची तयारी आहे. परंतु या ठिकाणी लग्नकार्यामध्ये ज्यांच्या मुलीचे लग्न आहे त्याने आग्रह करावयाचे सोडून कॉन्ट्रॅक्टरने आग्रह करावयाचा त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी सांगत आहेत की, आमची चर्चा करण्याची तयारी आहे. त्यांना बोलण्याचा कोणता अधिकार आहे ? त्यांनी सूचना दिलेली आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्या बोलण्यावर माझा आक्षेप आहे.

**सभापती** : मघाशी ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्यावेळी मी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना असे सांगितले होते की, मी तुम्हाला एक मिनिट बोलण्याची परवानगी देईन. त्याप्रमाणे मी त्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जे सांगितले त्याप्रमाणे नियम 289 अन्वये हा जो प्रस्ताव दिलेला आहे त्याबाबत सरकारचे जे मत असेल किंवा सरकारचा जो अभिप्राय असेल त्याबाबत मी नेत्यांचे मत गृहीत धरणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्यांना सरकारने अधिकार दिला असेल तर सभागृहाचे कामकाज थांबवावे आणि ही चर्चा सुरु करावी.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत मी आधी निर्णय देतो. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी ज्यावेळी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्यावेळी मी त्यांना सांगितले की, या ठिकाणी झालेल्या वक्तव्यांमध्ये किंवा कोणाच्या भाषणामध्ये एखादे चुकीचे वाक्य आले असेल तर ते मी तपासून घेईन आणि जर एखादे चुकीचे वाक्य आले असेल तर ते कामकाजातून काढण्यात येईल. त्यावेळी मी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगितले की, मी तुम्हाला एक मिनिट बोलण्याची परवानगी देईन. त्याप्रमाणे मी त्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. शेवटी याबाबतीत निर्णय घेत असताना सत्तारुढ पक्षाचे जे मत आहे त्याबाबत नेत्यांचेच मत मी गृहीत धरणार आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 11 तारखेला मुंबईमध्ये पश्चिम रेल्वेमध्ये दुर्दैवी बॉम्बस्फोट झाले. त्याचा निषेध केवळ एखाद्या व्यक्तीने किंवा एखाद्या पक्षाने केला असे नाही तर या देशातील सर्वांनीच त्याचा निषेध केलेला आहे. हा केवळ मुंबईचा प्रश्न नाही तर संपूर्ण देशाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

देशाच्या सार्वभौमत्वावर, देशाच्या एकात्मतेवर, देशाच्या सर्वधर्मसमभावाच्या तत्वावर हल्ला केला जात आहे असे सांगण्याचा काही मंडळी प्रयत्न करीत असून अशा प्रकारचे चित्र राज्यामध्ये आणि देशामध्ये निर्माण होता कामा नये. मी मघाशी सांगितले की, या चर्चेपासून आम्ही बाजूला जाऊ इच्छित नाही. परंतु त्यासाठी कामकाजपत्रिकेवरील प्रश्नोत्तराचा तास थांबविण्याची आवश्यकता नाही. सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास घेऊन आपण चर्चेला वेळ द्यावी. चर्चेला आमची तयारी आहे. मागील आठवड्यामध्ये नियम 97 अन्वये या सभागृहामध्ये 6 तास चर्चा झाली. माननीय गृहमंत्र्यांनी त्या चर्चेला उत्तर दिले. तेव्हा आता आपण प्रश्नोत्तराचा तास घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : माझा हरकतीचा मुद्दा आहे..

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे आमची सूचना मान्य करतात त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. तेव्हा आता चर्चेला सुरुवात करावी.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी 289 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलावयास पाहिजे असे समोरच्या सन्माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु त्यांनी तो प्रस्ताव ऐकलेला नाही आणि वाचलेलाही नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे वारंवार असे सांगत आहेत की, 11 तारखेला झालेल्या बॉम्बस्फोटावर 7 तास चर्चा झालेली आहे. परंतु आता बॉम्बस्फोटाच्या घटनेला 7 दिवस होऊन देखील आरोपींचा शोध अद्याप लागलेला नाही. त्यासंबंधात हा प्रस्ताव आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मूळ प्रस्ताव काय आहे तो माहीत नाही आणि त्यांनी तो वाचलेला देखील नाही.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांचा हरकतीचा मुद्दा मी स्वीकारत नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ प्रोसिजर आहे. सभापती महोदय, मी विनम्रपणे एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. या सभागृहाच्या कामकाजाचा अनुभव आणि मी हे अधिवेशन सुरु झाल्यापासून असे पाहत आहे की, सर्वसाधारणपणे विरोधी पक्षाला नियम 289 अन्वये स्थगन प्रस्ताव आणण्याचा अधिकार असतो. सदर प्रस्तावावर विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या सह्या असणे स्वाभाविक आहे. परंतु त्या प्रस्तावावर केवळ विरोधी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/

(श्री. भास्कर जाधव...)

पक्षाच्या सदस्यांच्या सह्या असल्यामुळे विरोधी पक्षाच्याच सदस्यांना बोलण्याची संधी मिळावी अशा प्रकारचा आग्रह सभापती महोदय, आपणाकडे धरण्यात येतो. सर्वसाधारणपणे या सभागृहामध्ये एखादा प्रस्ताव आल्यानंतर तो प्रस्ताव "हाऊसची प्रापर्टी" होते. त्यामुळे सभागृहातील सर्व सदस्यांना माननीय सभापतींच्या परवानगीने त्या प्रस्तावावर बोलण्याचा अधिकार प्राप्त होतो. 289 अन्वये दिलेला प्रस्ताव हा या सभागृहामध्ये शब्दश: वाचून दाखविण्यात आलेला नव्हता. प्रश्नोत्तराचा तास खंडित का करावा हेच याठिकाणी सांगितले गेले..(अडथळा).. आम्ही सांगू तेच माननीय सभापतींनी ऐकले पाहिजे अशी भूमिका विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घेणे इष्ट नाही. तेव्हा सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेऊन आपण निर्णय द्यावा अशी सभापती महोदय, माझ ी आपणास विनम्र विनंती आहे. ..(अडथळा)..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी नियम क्रमांक 289 वाचावा अशी माझी त्यांना विनंती आहे. नियम 289 मध्ये असे म्हटलेले आहे की, कोणत्याही सदस्यास, मग तो सदस्य सत्ताधारी पक्षचा असो अथवा विरोधी पक्षाचा असो....

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेमध्ये कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करताना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाल्यास संबंधित नियम त्यावेळेपुरता स्थगित होईल. हे फक्त विरोधी पक्षाच्या सदस्यांसाठी नसून सत्ताधारी पक्षाचे सदस्य देखील असा प्रस्ताव मांडू शकतात. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी प्रस्ताव मांडला नाही. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी म्हटले की, सत्तारुढ पक्षाला असा प्रस्ताव मांडता येत नाही. पण असे याठिकाणी म्हटलेले नाही. पॉईंट ऑफ प्रोसीजरच्या निमित्ताने सभागृहाची दिशाभूल करणारे वक्तव्य सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी केले आहे ते त्यांनी मागे घ्यावे व दुरुस्ती करावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : नियम 289 नुसार एखादा प्रस्ताव दिला तर तो कसा स्वीकारार्ह होतो हा ज्याप्रमाणे प्रस्तावकर्त्यांना सांगण्याचा अधिकार आहे त्याच पध्दतीने तो प्रस्ताव आवश्यक आहे का याबाबत अन्य कोणाही सदस्याला बोलावयाचे असेल आणि सभापतींनी परवानगी दिली तर त्याबाबत संभाषण करता येते. पॉईंट ऑफ प्रोसीजरच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी एवढे मर्यादित वक्तव्य केले की, ज्यावेळेला हा नियम 289 चा प्रस्ताव सभागृहात येतो तेव्हा प्रस्तावकर्त्यांना ज्याप्रमाणे तो आवश्यक आहे असे वाटते आणि अन्य कोणाही सदस्याचे वेगळे मत असेल आणि सभापतींनी परवानगी दिली तर ते मत मांडता येते. आता मी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना बोलण्यास परवानगी देत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे सगळे कामकाज स्थगित करुन एका महत्वपूर्ण बाबीवर चर्चा करावी अशा पध्दतीची मागणी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी केली आहे. ज्या दोन घटनांचा उल्लेख विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांमार्फत याठिकाणी करण्यात आला त्या घटनासंबंधी या सदनामध्ये यापूर्वी दोन वेळा सविस्तरपणे चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब सतत नियमाच्या पुस्तकाचा हवाला देतात. कदाचित त्यांनी आमच्यापेक्षा जास्त नियमांचे वाचन केले असावे. परंतु या सदनाचे कामकाज चालविण्याइतपत आम्ही सुध्दा नियमाचे पुस्तक वाचले आहे. नियमात स्पष्ट तरतूद आहे की, कोणत्याही घटनेवर एका अधिवेशनात एकाच वेळी चर्चा होते. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे म्हणाले की, घटना होऊन 7 दिवस झाले, अद्याप तपास लागलेला नाही म्हणून चर्चा व्हावी. उद्या 8 दिवस होतील

....2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/पूर्वी श्री.शिगम 14:35

श्री.आर.आर.पाटील........

म्हणून चर्चेची मागणी केली जाईल. काल 6 दिवस झाले म्हणून चर्चा व्हावी.......(अडथळा).... सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे व नितीनजी गडकरी बोलत असताना आम्ही त्यांचा सन्मान करीत असतो, शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेत असतो. असे असताना सन्माननीय विरोधी पक्षाच्या सदस्यांनी लोकशाही प्रक्रियेमध्ये पुढचे विचार ऐकून घेतले पाहिजेत. सभापती महोदय, नियम स्पष्ट आहेत. या सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालावे अशी या सदनाचा नेता म्हणून माझी आपल्याला विनंती आहे. सभागृहाचे कामकाज का स्थगित केले पाहिजे हे सांगत असताना जे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत त्याबाबतचे उत्तर शासनामार्फत महाराष्ट्रातील तमाम 10 कोटी जनतेला देण्याची नितांत आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी काही गोष्टींचा उल्लेख केला. ते म्हणाले, माननीय पंतप्रधान एक बोलतात, गृहमंत्री एक बोलतात.............

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. 12 जुलै रोजी या सभागृहामध्ये जी चर्चा झाली ती 11 जुलै रोजी मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यात जे लोक मृत्युमुखी पडले, जखमी झाले, हॉस्पिटलाईज झाले, रुग्णालयात त्यांची व्यवस्था झाली नाही या सिमित मुद्यावर चर्चा झाली.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

त्यानंतर श्रध्दांजली वाहण्यात आली. 12 तारखेनंतर ते आजतागायत राज्यामध्ये विविध घटना घडलेल्या आहेत, विविध लोकांनी विविध स्टेटमेंट केलेले आहेत, विविध लोकांनी विविध आव्हाने दिलेले आहेत, ज्यांची काही औकात नाही त्यांनी धमक्या दिलेल्या आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील 10 कोटी जनता संभ्रमात पडलेली आहे. काल राज्य सरकार मधील चार नेत्यांनी चार प्रकारचे स्टेटमेंट केलेले आहे त्यामुळे महाराष्ट्रातील जनता अजून संभ्रमात पडलेली आहे. त्यामुळे राज्यातील जनतेमध्ये सध्या जो संभ्रम निर्माण झालेला आहे तो संभ्रम दूर व्हावा यासाठीच आम्ही चर्चेची मागणी करीत आहोत व त्यासाठीच आम्ही चर्चेचा प्रस्ताव दिलेला आहे. सभागृहात बॉम्ब स्फोटावर चर्चा झालेली आहे त्यामुळे या विषयावर चर्चा होऊ नये असे या प्रस्तावात नाही. या ठिकाणी सन्माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले आहे की, या सभागृहात बॉम्बस्फोटाच्या संदर्भात चर्चा झालेली आहे त्यामुळे एकाच विषयावर एकाच अधिवेशनात सभागृहात दुस-यांदा चर्चा करता येत नाही. पहिल्यांदा बॉम्ब स्फोटाच्या संदर्भात चर्चा झालेली आहे परंतु आता जो विषय दिलेला आहे त्यामध्ये बॉम्ब स्फोट झाल्यानंतर जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यावर चर्चा व्हावी यासाठी आम्ही 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. बॉम्ब स्फोट झाल्यानंतर अजून सुध्दा या गुन्हयातील आरोपींना पकडण्यात आलेले नाही, या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात शासनाकडून वेगवेगळी माहिती जनते समोर जात आहे तसेच विविध लोक वेगवेगळे आव्हाने देत आहेत त्यामुळे या विषयाच्या संदर्भात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. तसेच या ठिकाणी आम्ही जो 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो स्वीकारला का जात नाही याचेही उत्तर माननीय गृहमंत्र्यांनी या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर देऊन महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला तर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन द्यावा. आम्ही या ठिकाणी 289 द्वारे जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर चर्चा होण्याची नितांत आवश्यकता आहे. या ठिकाणी आम्ही जो 289 चा प्रस्ताव दिलेला आहे त्यामुळे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन, आम्ही या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. माननीय गृहमंत्र्यांनी आम्ही दिलेला 289 चा प्रस्ताव कसा होत नाही ते सांगावे. आता माननीय गृहमंत्री जर उत्तर देणार असतील तर या विषयावर चर्चा झालीच पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे तो हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीही सांगितलेले आहे की, सभागृहाचे कामकाज हे नियमाप्रमाणे चालले पाहिजे. खालच्या सदनात मी अनेक वेळा स्थगन प्रस्तावावर चर्चा केलेली आहे. माननीय अध्यक्ष स्थगन प्रस्तावावर किती वेळ बोलू देतात? खरे म्हणजे स्थगनचा विषय कसा होतो इतकेच सन्माननीय सदस्यांनी सांगायचे असते आणि सर्व घटनेचे वर्णन पुढील भाषणात सदस्यांनी करायचे असते. परंतु या ठिकाणी नियम 93 चा विषय कसा होतो हे सांगून आपण सर्व भाषणे करुन मोकळे झालेला आहेत. आपण कुठलाही मुद्दा सोडला नाही. दुस-या बाजूने आपण प्रश्न उपस्थित करावयाचे आणि त्याची उत्तरे मात्र एकावयाची नाहीत ही जी विरोधी पक्षाची भूमिका आहे ती बरोबर नाही, योग्य नाही. राज्याच्या दृष्टीने हा विषय अतिशय संवेदनशील असा आहे.जनतेच्या दृष्टीने सरकारची जितके कर्तव्ये आहेत तेवढी विरोधी पक्ष म्हणून आपली सुध्दा संवेदनशील वेळी तितकीच महत्वपूर्ण कर्तव्ये आहेत. सभापती महोदय, राजकीय कुरघोड्या करण्यापेक्षा ज्यावेळी देशाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळी हातातहात घालून संपूर्ण देशाने एकसंघपणाने उभे राहण्याची आवश्यकता असते. ही राष्ट्रीय कर्तव्ये पार पाडीत असतांना, आपण काना-मात्र्याचा आधार घेऊन जी भूमिका व्यक्त करीत आहात ती भूमिका बरोबर नाही. बॉम्ब स्फोटाच्या घटनेचा तपास योग्य पध्दतीने सुरु आहे. सभापती महोदय, बॉम्ब स्फोटाच्या संदर्भात एटीएस चांगल्या प्रकारे तपास करीत आहे. माननीय पंतप्रधांनांनी काल स्पष्टपणे खुलासा केला आहे की, जनरल स्वरुपाचा इन्टेलिजन्स उपलब्ध होता काही धार्मिक स्थळांवर, काही व्यापारी उलाढाली होतात अशा ठिकाणी आतंकवाद्यांकडून हल्ले होऊ शकतात अशा स्वरुपाचा जरल इन्टेलिजन्स प्राप्त झाला होता व तो देशातील सगळया राज्यांना देण्यात आला होता. मात्र रेल्वेवर हल्ला केला जाईल अशी कुठलीही माहिती केंद्रसरकारकडे नव्हती असा स्पष्ट खुलासा माननीय पंतप्रधांनानी केलेला असल्यामुळे केंद्रसरकारची वेगळी मते आहेत, राज्य सरकारची वेगळी मते आहेत, यासंदर्भातील मत काल रात्री माननीय पंतप्रधांनानी सांगितलेली असल्यामुळे आता केंद्रात आणि राज्यात कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत वेगळे मत नाही. केंद्रसरकारची आणि राज्य

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधीपक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. आर.आर.पाटील......

सरकारची यंत्रणा एकत्र येऊन प्रोफेशनल पध्दतीने या घटनेचा तपास करीत आहे. या तपासातून निश्चितपणे लवकरच संबंधित सर्व आरोपी निष्पन्न होतील असा पोलीस दलाला पूर्णपणे विश्वास आहे. आज वर्तमानपत्रात दिल्या जाणा-या बातम्या आणि त्याच्या आधारे सदनाचा केला जाणारा दुरुपयोग हे काही योग्य नाही. पोलीस महासंचालक श्री. पसरीचा यांनी बॉम्ब स्फोटात राजकारणी व्यक्तींचा हात आहे असे कधीही म्हटले नव्हते. परंतु त्यांनी भिवंडीच्या संदर्भात जे वक्तव्य केले होते त्यांचे ते वक्तव्य बॉम्ब स्फोटाशी जोडले गेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

श्री.आर.आर.पाटील.............

सभापती महोदय, या राज्यामध्ये वेगवेगळे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न कोण करीत आहे ? माझा स्पष्ट आरोप आहे की, बॉम्बस्फोट झाल्यानंतरसुध्दा राज्यातील जनता पूर्णपणे सावरलेली आहे. सर्वसामान्य जनतेने त्यांची दिनचर्चा नियमित ठेवली आहे. त्यामुळे दोन्ही बाजुकडील अतिरेकी राजकारणी मात्र अस्वस्थ आहेत.बॉम्बस्फोटासारखी घटना घडल्यानंतर सुध्दा अल्पसंख्याक कॉन्संट्रेट होत नाहीत, ह्या घटनेनंतरसुध्दा हिंदुत्ववादी अतिरेकी एकत्र येत नाहीत म्हणून त्या दोघांचे प्रयत्न सुरु आहेत. मढावरील लोणी खाण्याचा प्रयत्न दोन्ही बाजुंनी केला जात आहे. पण महाराष्ट्रातील जनतेने, बॉम्बस्फोटाचा, दंगलीचा अनुभव घेतलेला असल्यामुळे दोन्ही बाजुच्या अतिरेकी कारवाया करणाऱ्यांना राज्यातील जनता साथ देत नाही. बॉम्बस्फोटातील आरोपिंना पकडण्यापेक्षा, या घटनेचे राजकीय भांडवल करण्याचा विरोधी पक्षाचा प्रयत्न महाराष्ट्रातील धर्मनिरपेक्ष जनतेने हाणून पाडला पाहिजे. या देशावर हल्ला होत आहे, या हल्ल्याचा गांभीर्याने विचार करण्याऐवजी, या राज्यातील आणि देशातील सत्ता आपल्याला मिळाली पाहिजे म्हणून राजकीय वक्तव्य करणाऱ्या जातीयवादी शक्तींचा मी निषेध करतो. सभापती महोदय, एका बाजुला हिंदू अतिरेकी हिंदुना भडकाविण्याचा प्रयत्न करीत आहेत, तर दुसऱ्या बाजुला मुस्लिम अतिरेकी मुस्लिमांना भडकाविण्याचा प्रयत्न करीत आहेत. जाती-जातींमध्ये दंगे भडकले पाहिजेत, धर्माधर्मात संघर्ष पेटले पाहिजेत आणि त्यावर आपली राजकारणाची पोळी भाजली पाहिजे यावर डोळा ठेवून या घटनेकडे कोण पाहत असेल तर अतिरेक्यांप्रमाणे या व्यक्ती देखील देशावर आघात करणाऱ्या आहेत, देशाच्या सुरक्षितेला धोका पोहाचविणाऱ्या आहेत, देशाच्या एकतेचा बाधा आणणाऱ्या आहेत. सभापती महोदय, गुजरात राज्याचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांची आज सभा आहे याची मला कल्पना आहे. श्री.नरेंद्र मोंदी यांच्या सभेला जावयाचे

AJIT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:45

श्री.आर.आर.पाटील.........

असल्यामुळे त्यांना सभागृहाचे कामकाज बंद करुन जावयाचे आहे, परंतु अशा पध्दतीचे कामकाज हा संसदीय कामकाजावरील हल्ला आहे. आम्हाला श्री.नरेंद्र मोदी यांच्या सभेला जावयाचे आहे, असे उघडपणे सांगून ते गेले असते तर आम्ही त्यांची पाठ थोपटली असती. पण कोणते तरी निमित्त करायचे आणि सभागृहाचे कामकाज बंद पाडायचे हे बरोबर नाही. श्री.नरेंद्र मोदी यांच्या सभेला उपस्थित रहावयाचे असल्यामुळे त्यांना सभागृहाचे कामकाज आज बंदच ठेवायचे आहे. सरकारवर आरोप करुन कामकाज बंद ठेवण्यापेक्षा आम्हाला श्री.नरेंद्र मोदी यांच्या सभेला जायचे आहे, म्हणून आम्ही कामकाज बंद पाडत आहोत असे सांगा, सरकारवर आरोप करुन त्यांनी जाऊ नये.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : या ठिकाणी माझ्यासमोर नियम 289 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्या प्रस्तावास मी परवानगी देऊ शकत नाही. आता मी पुढील प्रश्न चर्चेसाठी घेत आहे.

दिनांक 3 जुलै 2006 रोजी उत्तर झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक 17346 सर्वप्रथम चर्चेला घेण्यात येत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**( राखून ठेवलेला तारांकित प्रश्न )**

**कोकणातील खाजण जमिनीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(7) * 17346 श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. विलास अवचट , डॉ. निलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक 14394 ला दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **खार जमीन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोकणातील खाजण जमिनीची दुरुस्ती करण्याबाबत कोकणातील 4 जिल्ह्यातील 25 योजनांचा रु.14.90 कोटी किंमतीचा माहे सप्टेंबर, 2005 मध्ये सचिव मदत कार्य व पुनर्वसन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केलेला नवा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा त्याचे स्वरुप काय आहे,

(3) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (1) कोकणातील खाजण जमिनीची दुरुस्ती करण्याबाबत कोणताही प्रस्ताव या विभागाकडे प्राप्त झालेला नाही. तथापि राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण प्रकल्पांतर्गत कोकणातील 4 जिल्हयांसाठी समुद्राच्या/खाडीजवळच्या बांधाचे नुतनीकरणाचा रु.14.90 कोटीचा प्रस्ताव मुख्य अभियंता जलसंपदा विभाग कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला आहे.हा प्रस्ताव जागतिक बँकेच्या मदतीने अंमलात आणणाऱ्या प्रकल्पाचा एक भाग आहे.

(2) प्रस्तावाची छाननी पूर्ण झालेली असून केंद्र शासनाकडून प्राप्त झालेली मार्गदर्शक तत्वे अंतर्भूत करण्यात आली आहेत. हा प्रस्ताव लवकरच केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला जाईल.

(3) वरील प्रमाणे.

( उप प्रश्न झाले नाहीत. )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( तारांकित प्रश्न )**

**वरुड तालुक्यतील भूगर्भिय पाण्याच्या अतिशोषीत भागासाठी वर्धा डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्प**

**(1) * 17368 श्री. रमेश निकोसे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक 9297 ला दिनांक 6 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 15 जून, 2005 च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त वर्धा डायव्हर्शन (WRII Canal Project) कॅनॉल प्रकल्पाचा भाग असलेल्या पांढरी तलाव प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(2) या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली हे खरे आहे काय,
(3) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (1) वर्धा डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाचा भाग असलेल्या पांढरी प्रकल्पाच्या मुख्य कामाच्या निविदेस दिनांक 20.06.2006 ला शासनाची मंजूरी दिली आहे.
(2) नाही.
(3) प्रश्न भाग-1 प्रमाणे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच शासनाला धन्यवाद देतो. माझे फक्त दोनच स्पेसिफीक प्रश्न आहेत. वन विभागाची मान्यता मिळविण्यासाठी कंत्राटदाराला आदेश देण्यात आलेले आहेत काय ? असल्यास, हे आदेश कोणत्या तारखेला देण्यात आले ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, वन विभागाची मान्यता मिळविण्यासाठी कंत्राटदाराला दिनांक 5.6.1006 रोजी आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच कंत्राटदाराने वन विभागाकडून सहा महिन्यांच्या आत क्लिअरन्स आणले पाहिजे अशी अट घालण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17368....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सोमवार, दि.28 मार्च, 2005 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 1797 ला उत्तर देताना सांगितले होते की, 31 मेपर्यंत पांढरी प्रकल्पाला मान्यता देऊ आणि उर्वरित भागाला म्हणजे, चांदस वाठोडी व जरुडला 31 ऑगस्टपर्यंत मान्यता देण्यात येईल. मग, वर्धा डायव्हर्शनच्या या उर्वरित भागाला मान्यता दिली का ? नसेल तर या 31 ऑगस्टपर्यंत ती दिली जाईल का ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या बाबतीत प्रकल्प अहवाल तयार झालेला आहे. तो सी.ई.कडून दोन महिन्यांच्या आत मंत्रालयात पाठविला जाईल. त्यानंतर या दोन प्रकल्पांसाठी प्रशासकीय मान्यता दिली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासन चांदस वाठोडा व जरुड या दोन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देणार आहे. परंतु ती प्रशासकीय मान्यता 1-2-3 महिन्यांमध्ये केव्हा देण्यात येईल ? माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी स्पेसिफीक उत्तर द्यावे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, वर्धा डायव्हर्शन कॅनॉलच्या बाबतीत आपण अगोदर 6 महिन्यांमध्ये फॉरेस्ट क्लिअरंस घेऊ. त्यानंतर दोन महिन्यांमध्ये याला मान्यता दिली जाईल.

--------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सोमेश्वर गावाला (जि. रत्नागिरी) काजळी नदीच्या ठिकाणी**
**धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी निधी**

**(२) * १८४२३ श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील काजळी नदीच्या जवळ असलेले सोमेश्वर या गावाला नदीच्या पुरामुळे सतत धोका उत्पन्न होतो म्हणून येथे धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी २ कोटी ३७ लाख रुपये शासनाने मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी मंजूर असून सुद्धा धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे कामास अद्याप सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत,
(३) पावसाळ्यापूर्वी या धुप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम पूर्ण न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सरपंच विनायक गावडे यांनी दिनांक ७ मे, २००६ रोजी वा त्या सुमारास दिला आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या धुप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामास त्वरीत सुरुवात करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.दयानंद मस्के, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता**: (१) व (२) सन २००६-२००७ मध्ये या कामासाठी रु.२ लाख एवढी तरतूद करण्यात आली आहे.
(३) निवेदन शासनाकडे अथवा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे प्राप्त झालेले नाही.
(४) निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण रत्नागिरी जिल्हयातील काजळी नदीच्या जवळ असलेल्या सोमेश्वर या गावाला नदीच्या पुरामुळे सतत धोका उत्पन्न होतो म्हणून येथे धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी २ कोटी ३७ लाख रुपये शासनाने मंजूर केले, ते खरे आहे काय ? कारण याठिकाणी आपण फक्त फक्त २ लाख रुपयांचीच तरतूद केलेली आहे. त्यामुळे याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, बंधारा पूर्ण होण्याच्या दृष्टीने निधी उपलब्ध करुन देऊन सदरचा बंधारा केव्हापर्यंत पूर्ण केला जाईल ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील काजळी नदीच्या जवळ असलेल्या सोमेश्वर या गावाला नदीच्या पुरामुळे सतत धोका उत्पन्न होतो म्हणून येथे धूप प्रतिबंधक बंधारा बांण्यासाठी सन २००४-२००५ मध्ये रुपये ८ लाख ४२ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन २००५-२००६ मध्ये काहीच तरतूद नव्हती. सन २००६-२००७ साठी २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारे बंधाऱ्यासाठी एकूण १० लाख ४२ हजार रुपयांची तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

..३.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित...

१४:५०

ता.प्र.क्र.१८४२३....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याठिकाणी शासनाने पूर्णपणे उत्तर लपवलेले आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, हा बंधारा झाला नाही तर तेथील लोकांच्या जीविताला फार मोठा धोका निर्माण होणार आहे. त्यामुळे या बंधाऱ्याचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने सरकार स्वत:च्या उत्पन्नातून २ कोटी ३७ लाख रुपयांची तरतूद उपलब्ध करुन देणार का ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, सदरचे काम हे जिल्हा नियोजनाच्या टप्प्यातील असून त्यासाठी २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, सन २००४-२००५ मध्ये यासाठी ८ लाख ४२ हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे एकूण १० लाख ४२ हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे स्वतंत्रपणे यासाठी निधी उपलब्ध करता येणार नाही.

------

..४.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित...

१४:५०

**तापी डायव्हर्शन कॅनाल प्रकल्प**

**(३) * १७४१७ श्री. सुधाकर गणगणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्ही. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२७५१ ला दिनांक ७ एप्रिल, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी-गर्गा संगमाच्या खाली चिचघाट येथे धरण बांधून डाव्या तिरावरील कालव्याच्या माध्यमातून अमरावती व अकोला या जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यांचा काही अनुशेष दूर करु शकणाऱ्या तापी डायव्हर्शन कॅनाल प्रकल्पाच्या तपशिलवार सर्वेक्षणाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) या सर्वेक्षणाच्या पूर्ततेसाठीचे काय वेळापत्रक निश्चित करण्यात आलेले आहे,

(३) नियोजित वेळापत्रकाप्रमाणे हे सर्वेक्षण केव्हा पूर्ण होण्याचे प्रस्तावित आहे ?

**डॉ.सुनील देशमुख,श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) धरणरेषेचे सर्वेक्षण सुरु असतांना स्थानिक लोकांनी तीव्र विरोध केल्यामुळे सर्वेक्षणाचे काम बंद आहे.

(२) मेळघाटातील जनतेचा तीव्र विरोध लक्षात घेता वेळापत्रक निश्चित करण्यात आले नाही. तथापि हे सर्वेक्षण हवाई सर्वेक्षण पध्दतीने करण्याचा विचार क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये जे म्हटले आहे, ते खरे आहे. काही लोकांनी आदिवासींच्या विरोधात कारस्थान सुरु केलेले आहे. खरी गोष्ट अशी आहे की, जून्या प्रकल्पामध्ये ५७ गावे जात होती, तापी-गर्गा संगमाच्या खाली चिचघाटमध्ये ५ गावे जात आहेत.

नंतर श्री.रोझेकर.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.17417 पुढे सुरु.........**

प्रा.बी.टी.देशमुख.........

या नव्या साईटमुळे 13 हजार हेक्टर आदिवासी क्षेत्राला सिंचन क्षमता मिळू शकणार आहे. यासंदर्भात दिनांक 19/12/2005 रोजी अधिका-यांची जी बैठक झाली त्यामध्ये असे ठरले की, या क्षेत्राचे हवाई सर्व्हेक्षण करण्यात यावे. माझी शासनाला विनंती आहे की, या प्रदेशाची भौगोलिक स्थिती लक्षात घेता बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार हवाई सर्व्हेक्षण करण्यात येईल काय ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, हवाई सर्व्हेक्षणाचे आदेश दिले जातील व हवाई सर्व्हेक्षण करण्यासाठी 2 कोटी 68 लक्ष रुपये एवढया खर्चास मंजूरी देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी शासनाचा आभारी आहे. हा आदिवासींना जलसिंचन क्षमता देण्याचा प्रश्न आहे. जवळ जवळ 13 हजार हेक्टर क्षेत्राचे हवाई सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. ज्यावेळी हे हवाई सर्व्हेक्षण होईल त्यावेळी येथील लोकांना हे कळेल की, या प्रकल्पास कोण विरोध करीत आहे. म्हणून मला असे वाटते की, हवाई सर्व्हेक्षण करण्यासाठी काही कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे हवाई सर्व्हेक्षण करण्याबाबत काही मुदत घालून देण्यात येईल काय ? किती कालावधीत हे सर्व्हेक्षण करण्यात येईल ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, नॅशनल रिमोट सेंन्सिग एजन्सीमार्फत करण्यात येणा-या हवाई सर्व्हेक्षणासाठी 2 कोटी 68 लक्ष रुपये खर्चास मंजूरी देण्यात आलेली आहे. संबंधित एजन्सीने शासनाकडे चेकलिस्ट पाठविली असून त्याबाबतचे उत्तर राज्य शासनाकडून पाठविण्यात आले आहे. या एजन्सीकडून खर्चाचे अंदाजपत्रक राज्य शासनाला सादर करण्यात येणार आहे. अंदाजपत्रक शासनाला सादर झाल्यानंतर तेवढया खर्चास मान्यता देण्यात येईल. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सर्व्हेक्षण करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 57 मिनिटांनी, 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 12 मिनिटांनी 15 मिनिटासाठी स्थगित करण्यात आली.)

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर ... )

**सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी**

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवणे.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात ... )

सचिव : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने शनिवार, दिनांक 15 जुलै 2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**तालिका सभापती** : दिनांक 15 जुलै 2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( **प्रेस** : येथे सोबत जोडलेली यादी छापावी. )

....... एन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात ... )

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : महोदया, मी आपल्या अनुमतीने " चितळी (ता.खटाव, जिल्हा सातारा) येथील येरळा नदीच्या पात्रात जलसेतू कोसळून झालेला अपघात " या विषयावरील श्रीमती कांता नलावडे, श्री.रामनाथ मोते, श्री.गुरूमुख जगवानी,वि.प.स., डॉ.अशोक मोडक (माजी वि.प.स.), आणि सर्वश्री.नितीन गडकरी, गोविंदराव आदिक, संजय दत्त, सुधाकर गणगणे, रमेश निकोसे, धनाजी साठे, वि.प.स., यांच्या दिनांक 24 मार्च 2006 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 14446 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( **प्रेस** : सोबतची 'अधिक माहिती' येथे छापावी. )

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात ... )

( यानंतर श्री. सरफरे ..... ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

(गोंधळ)

श्री.राणा जगजितसिंह पाटील (रोजगार आणि स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अ□ुमती□ मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मर्यादितचा सन 2003-2004 चा चौथा वार्षिक अहवाल सभा□ृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभा□ृहासमोर ठेव□यात आला आहे.

(घोषणा)

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, मी आपल्या अ□ुमती□ महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ, मर्यादितचा सन 2004-2005 चा चोविसावा वार्षिक अहवाल सभा□ृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभा□ृहासमोर ठेव□यात आला आहे.

(घोषणा)

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अ□ुमती□ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादितचा सन 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे सातवा व आठवा वार्षिक अहवाल सभा□ृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभा□ृहासमोर ठेव□यात आला आहे.

(घोषणा)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती मंदा म्हात्रे (समिती सदस्या) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा "सन 2006-2007 या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या विक्रीकर कार्यालयाचे संगणकीकरण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग अंतर्गत "सेंटर्स ऑफ एक्सलेन्स" या योजनेंतर्गत 12 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ तसेच सांस्कृतिक कार्य विभाग अंतर्गत "रंगभूमीवर दर्जेदार नाट्य प्रयोगांच्या निर्मितीसाठी सहायक अनुदान" या नवीन बाबीसंबंधातील अंदाज समितीचा सहावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

महोदया,सदर अहवाल सादर करीत असताना अहवालातील काही प्रमुख शिफारशींचा मी या ठिकाणी उल्लेख करु इच्छिते.

विक्रीकर विभागाने सन 2004-2005 मध्ये जवळपास 21 लाख व्यापारी आणि व्यवसायधारक यांचेकडून अंदाजे 20 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्रीकर गोळा केला आहे. करदात्यांची वाढत जाणारी संख्या लक्षात घेऊन राज्य शासनाने यावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने विक्रीकर विभागाच्या संगणकीकरणाची योजना आखण्याचा प्रथम निर्णय घेतला. सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी संगणक तंत्रज्ञान सामुग्री व सेवेच्या अधिग्रहणासाठी खाजगीकरणांतर्गत बांधा, मालकी ठेवा, वापरा व नविनीकरण करा (बी.ओ.ओ.आर) हे तत्व अंमलात आणावयाचे ठरविण्यात आले. पाच वर्षाच्या कार्यक्रमासाठी एकूण 142 कोटी अंदाजित खर्च येणार आहे. सदर प्रकल्प महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या सर्व विक्रीकर कार्यालयांमध्ये राबविण्यात येत असून राज्यातील सर्व विक्रीकर कार्यालयातील सर्व संगणक विक्रीकर कार्यालयाच्या मुख्य कार्यालयासहित एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. विक्रीकर कार्यालयाचे संगणकीकरण करण्यासाठी सन 2002-2003 ते 2005-2006 या कालावधीत एकूण रुपये 14.97 कोटींची तरतूद करण्यात आली असून प्रत्यक्षात या कालावधीत खर्च रुपये 4.95 कोटी एवढा झालेला आहे. राज्यातील विक्रीकर विभागाच्या सर्व कार्यालयामंध्ये संगणक हे एकमेकांशी जोडण्यात येणार असल्यामुळे राज्यातील विक्रीकर संबंधातील माहिती एका ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल.

कर आकारणीची थकित प्रकरणे देखील मोठया प्रमाणात आहेत. या सर्व कामासाठी विक्रीकर विभागाला जादा कर्मचारी / अधिकारी वर्ग यांची आवश्यकता आहे. याबाबतचा प्रस्ताव



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

विक्रीकर विभागाने शासनाकडे सादर केलेला आहे. विक्रीकर विभागाचा कर्मचारी वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने मंजूर करावा आणि विक्रीकर कार्यालयाचे संगणकीकरण करण्याबाबत विनाविलंब अंमलबजावणी करावी अशी समिती आग्रहाची शिफारस आहे.

"सेंटर ऑफ एक्सलेन्स" ही योजना केंद शासनाने 2005 मध्ये मंजूर केली असून सन 2006-2007 च्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. त्याकरीता 9 कोटी रुपये रकमेची तरतूद करण्यात आली असून राज्यातील एकूण 12 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करण्याचे शासनाने ठरविले आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करुन जागतिक दर्जाचे कुशल कारागीर तयार करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. शासनाने निवड केलेल्या शहराबरोबरच ग्रामीण भगातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचीसुध्दा निवड करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. राज्यातील सर्व विभागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची कार्यक्रमांतर्गत निवड करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. ग्रामीण भागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील काही अभ्यासक्रमाकरीता मुलींचे प्रमाण कमी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत अशी समितीची शिफारस आहे.

शासनामार्फत दर्जेदार मराठी चित्रपटांकरीता अनुदान देण्याची योजना अस्तित्वात आहे. याच योजनेच्या धर्तीवर राज्यातील विविध नाट्यसंस्थांकडून अनुदान मिळण्याची मागणी झाली आणि राज्यातील मराठी व्यावसायिक नाटकांना अनुदान देण्याची योजना जाहीर केली आहे. त्याच धर्तीवर तमाशा कलावंत यांचेसाठीसुध्दा अशी प्रकारची योजना सुरु करण्याची शासनाकडे मागणी प्राप्त झ ाालेली आहे. याप्रकरणी शासनाने तमाशा कलावंत व त्यांच्या संस्थांशी चर्चा करुन यावर ताबडतोब निर्णय घेण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

**तालिका सभापती** : अंदाज समितीचा सहावा अहवाल सभागृहास सादर करण्यात आला आहे.

----

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्दयासंबंधी

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

(गोंधळ)

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी औचित्याचे मुद्दे उपस्थित करावेत.

(माननीय सदस्य औचित्याचे मुद्दे उपस्थित करीत नाहीत)

(घोषणा)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

(गोंधळ)

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. गोपिकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी "केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण योजना व झोपडपट्टी योजना शासनाने अद्याप हाती न घेतल्याने केंद्राचा आलेला कोटयावधी रुपयांचा निधी परत जाण्याचा निर्माण झालेला गंभीर धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी "पुणे शहरातील वडगाव जल शुध्दीकरण प्रकल्पाचे काम महानगरपालिकेने वारंवार घोषणा करुनही बंद असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "जुलै, 2006 च्या दुसऱ्या आठवडयात मौजा कावळगोदी (ता. राजुरा, जि. चंद्रपूर) येथील शेतकरी आबाजी राठोड व गाडेगाव खुर्द (जि. बुलढाणा) येथील शेतकरी प्रकाश खुपसे आणि वडगांव पाटण येथील शेतकरी उत्तम उमाळे या तीन शेतकऱ्यांनी कर्ज व नापिकीला कंटाळून केलेली आत्महत्त्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स.यांनी "दि. 11 जुलै, 2006 रोजी राजगुरुनगर (जि. पुणे) तालुक्यातील वीस हजार एकर जमीन विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित करण्यात येत असल्याच्या विरोधात नागरिकांनी काढलेला विराट मोर्चा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )O 6

DGS/ D/ MHM/ 15:10

**तालिका सभापती...**

माननीय सदस्य श्री. जयंत पाटील,वि.प.स. यांनी "दि.15 जुलै 2006 रोजी रायगड जिल्हा परिषदेचे प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रमोद जाधव यांना ग्रामपंचायत किहीम येथे शासकीय माहिती घेण्यासाठी गेले असता अज्ञात इसमांनी गाडी अडवून केलेली बेदम मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. श्रीकांत जोशी, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "परभणी जिल्हयातील पाथरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. व्ही. एम. अंभोरे यांनी पदे रिक्त नसताना 21 बेकायदेशीर नियुक्त्या करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी "दि. 14 जुलै, 2006 रोजी नेर्ले, ता.वाळवा, जि. सांगली येथील शेतकरी श्री. विश्वास देशमुख पाटील यांचा शेतात तुटून पडलेल्या विद्युत तारांचा स्पर्श होऊन शॉक लागून मृत्यू होणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (पुढे सुरु.....

माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे व इतर,वि.प.स. यांनी "मे, 2004 मध्ये केलेल्या मुल्यांकनात अनुदानासाठी अपात्र ठरलेल्या माध्यमिक शाळा व सन 2000-2001 मध्ये विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळांची यादी जाहीर न केल्याबाबत," या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी "दिनांक 14 जुलै,2006 रोजी पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर, थेऊर, ता.हवेली येथील श्री.चिंतामणी मंदिराजवळ दोन गटांत हाणामारी होऊन झालेली दंगल", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)...

...अडथळा....

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रायगड जिल्ह्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित होणे.

**मु.शी.**: रायगड जिल्ह्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित होणे, याबाबत श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेंद्र शिंगणे ( पुनर्वसन राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी रायगड जिल्ह्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित होणे, या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई शहर व उपनगरात दिनांक 4 जुलै,रोजी पडलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळित होणे.

**मु.शी.** : मुंबई शहर व उपनगरात दिनांक 4 जुलै,रोजी पडलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळित होणे,या बाबत सर्वश्री विनोद तावडे,नितीन गडकरी,मधुकर चव्हाण, डॉ.अशोक मोडक,श्रीमती कांता नलावडे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे, ( नगर विकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री. विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी मुंबई शहर व उपनगरात दिनांक 4 जुलै, रोजी पडलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळित होणे, या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....(अडथळा).. (घोषणा देण्यात येतात.)...

**पृ.शी**. : डायरेक्टर टेक्निकल एज्युकेशन यांच्या बेबसाईटची गती जलद करुन फॉर्म भरण्याची तारीख वाढवून देण्यात येणे.

**मु.शी**. : डायरेक्टर टेक्निकल एज्युकेशन यांच्या बेबसाईटची गती जलद करुन फॉर्म भरण्याची तारीख वाढवून देण्यात येण्याबाबत सवश्री सागर मेघे,नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर,वि.प.वि. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी : ( वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री. सागर मेघे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी डायरेक्टर टेक्निकल एज्युकेशन यांच्या बेबसाईटची गती जलद करुन फॉर्म भरण्याची तारीख वाढवून देण्यात येण्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात फोंडे परिसरात जंगली हत्तींनी घातलेला धुमाकुळ.

**मु.शी.** : सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात फोंडे परिसरात जंगली हत्तींनी घातलेला धुमाकुळ याबाबत सर्वश्री प्रताप सोनावणे,विनोद तावडे,नितीन गडकरी,मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते : ( महसूल व वन विभाग मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री. प्रताप सोनावणे, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात फोंडे परिसरात जंगली हत्तींनी घातलेला धुमाकुळ या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस: सोबतचे निवेदन छापावे.)

--

.....(अडथळा).....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/

**पृ.शी**. : मे किनवटकर कृषी उद्योग प्रा.लि.,मे.डेक्कन सेल्स प्रा.लि., मे.एम.ए.आय.डी.सी.प्रा.लि. या व इतर कंपन्यांकडून राज्यातील शेतकऱ्यांना भेसळयुक्त मिश्र खतांचा होणारा पुरवठा.

**मु.शी**. : मे किनवटकर कृषी उद्योग प्रा.लि.,मे.डेक्कन सेल्स प्रा.लि., मे.एम.ए.आय.डी.सी.प्रा.लि. या व इतर कंपन्यांकडून राज्यातील शेतकऱ्यांना भेसळयुक्त मिश्र खतांचा होणारा पुरवठा, याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी मे. किनवटकर कृषी उद्योग प्रा.लि.,मे. डेक्कन सेल्स प्रा.लि.मे.एम.ए.आय.डी.सी. प्रा.लि. या व इतर कंपन्यांकडून राज्यातील शेतकऱ्यांना भेसळयुक्त मिश्र खतांचा होणारा पुरवठा, या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील अवर्षणप्रवण 148 तालुक्यांचा सिंचन अनुशेष शासनाने अद्याप न भरणे.

**मु.शी.** : राज्यातील अवर्षणप्रवण 148 तालुक्यांचा सिंचन अनुशेष शासनाने अद्याप न भरणे,याबाबत सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता,वि.स.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे( नगर विकास विभाग राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.स.स. यांनी राज्यातील अवर्षणप्रवण 148 तालुक्यांचा सिंचन अनुशेष शासनाने अद्याप न भरणे, या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/

**पृ.शी**. : दिनांक 12-7-2006 रोजी रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथील आगराकोट किल्ला भागातील बंदर विभागाच्या पडीक गोदामात सापडलेले दहा डिटोनेटर्स मुंबई शहरात येणे.

**मु.शी**.: दिनांक 12-7-2006 रोजी रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथील आगराकोट किल्ला भागातील बंदर विभागाच्या पडीक गोदामात सापडलेले दहा डिटोनेटर्स मुंबई शहरात येणे, याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे :( गृह, तुरुंग, फलोत्पादन राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे, वि.स.स. यांनी दिनांक 12-7-2006 रोजी रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथील आगराकोट किल्ला भागातील बंदर विभागाच्या पडीक गोदामात सापडलेले दहा डिटोनेटर्स मुंबई शहरात येणे, या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--

...अडथळा...

(घोषणा देण्यात येतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/

**पृ.शी.** : घडयाळी तासांवर काम करणाऱ्या शिक्षकांना मानधन देण्याबाबत कार्यवाही न होणे

**मु.शी.** : घडयाळी तासांवर काम करणाऱ्या शिक्षकांना मानधन देण्याबाबतकार्यवाही न होणे या विषयावरील सर्वश्री रामनाथ मोते,श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

----

**पृ.शी.** : बोगस ठपका असलेल्या 354 स्वातंत्र्य सैनिकांचे प्रस्ताव स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीने मंजूर करणे

**मु.शी.** : बोगस ठपका असलेल्या 354 स्वातंत्र्य सैनिकांचे प्रस्ताव स्वातंत्र्य सैनिकउच्चाधिकार समितीने मंजूर करणे या विषयावरील प्रा.फौजिया खान,सर्वश्री सदाशिवराव पोळ, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड,वसंत चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

-----

**पृ.शी.** : प्रियंका लंकारिया हिला अज्ञात हल्लेखोरांनी पळवून नेऊन बलात्कार करुन तिचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस येणे

**मु.शी.** : प्रियंका लंकारिया हिला अज्ञात हल्लेखोरांनी पळवून नेऊन बलात्कार करुन तिचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस येणे या विषयावरील सर्वश्री नितीन गडकरी, प्रतापराव सोनवणे, पांडुरंग फुंडकर, गुरुमुख जगवानी, संजय दत्त, प्रतापसिंह मोहिते-पाटील, सुरेशदादा देशमुख, रमेश निकोसे,डॉ.वसंत पवार, प्रा.फौजिया खान, श्री.अरविंद सावंत, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

-----

17-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) P-10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/

**पृ.शी**. :पिंपरी-चिंचवड येथील वाकड कावेरी नगरामध्ये पोलीस वसाहतीवर शेकडो गावकऱ्यांनी लाठया-काठया, कुऱ्हाडी घेऊन केलेला हल्ला.

**मु.शी**. : पिंपरी-चिंचवड येथील वाकड कावेरी नगरामध्ये पोलीस वसाहतीवर शेकडो गावकऱ्यांनी लाठया-काठया, कुऱ्हाडी घेऊन केलेला हल्ला या विषयावरील श्री.अरविंद सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही. )

-----

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

**पृ. शी.** : नंदुरबार येथील वास्तुशास्त्र महाविद्यालयाच्या चौथ्या वर्षाच्या मे-जून, 2006 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न विचारण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला गोंधळ.

**मु. शी.** : नंदुरबार येथील वास्तुशास्त्र महाविद्यालयाच्या चौथ्या वर्षाच्या मे-जून, 2006 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न विचारण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला गोंधळ यासंबंधी श्री चंद्रकांत रघुवंशी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत रघुवंशी ( धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नंदुरबार येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे वास्तुशास्त्र महाविद्यालयाच्या चौथ्या वर्षाच्या मे-जून, 2006 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत अभ्यासक्रमाबाहेरील काही प्रश्न विचारण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला गोंधळ, याबाबत संस्थाध्यक्ष, महाविद्यालयाच्या प्राचार्य व विद्यार्थी व त्यांचे पालक यांनी वारंवार लेखी तक्रारी विद्यापीठाकडे देऊनही विद्यापीठाने अद्यापही सकारात्मक भूमिका न घेणे, यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जात असल्याने विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, यापूर्वीही "हौसिंग व बिल्डिंग कन्स्ट्रक्शन-6" या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत अशा प्रकारचा घोळ करण्यात आल्याचे आढळून येणे, अशाप्रकारे विद्यापीठाच्या गलथान कारभारामुळे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊन त्यांचे नुकसान होणार असल्याची निर्माण झालेली भीती, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MHM/

श्री. सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नंदुरबारमधील हे एकमेव आर्किटेक्चर कॉलेज आहे. त्या ठिकाणी चौथ्या वर्षाच्या सेमिस्टरच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत 70 टक्के गुणांचे प्रश्न सिलॅबसच्या बाहेरचे होते. ही बाब विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या निदर्शनास आणून दिली. प्राचार्यांनी सुध्दा विद्यापीठाला तसे कळविले. संस्था चालकांनी सुध्दा विद्यापीठाला कळविले. 70 टक्के प्रश्न सिलॅबसच्या बाहेरचे विचारले असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांची नव्याने परीक्षा घ्यावी अशी विनंती करतो. त्या विद्यार्थ्यांची सिलॅबस प्रमाणे परीक्षा घेणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, विद्यापीठाने दोन बाबीच्या संदर्भात नेमलेल्या चौकशी समितीमार्फत चौकशी होऊन दोन्ही प्राध्यापकांनी त्यांचे अहवाल दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी जी विनंती केलेली आहे त्याबाबत परत विद्यापीठाच्या अधिकाऱ्याबरोबर बोलून आम्ही योग्य कार्यवाही करु.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : यासंदर्भातील निर्णय दोन दिवसात घेणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : लवकरात लवकर निर्णय करु.

----

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MHM/

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील मौजा झरी पेंडपल्ली, टाकळी (ज.), मरखेल तांडा, दरेगांव या चार गावातील मजुरांना पगार वाटप न होणे.

**मु. शी.** : महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील मौजा झरी पेंडपल्ली, टाकळी (ज.), मरखेल तांडा, दरेगांव या चार गावातील मजुरांना पगार वाटप न होणे याबाबत प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुका येथील मौजा झरी पेंडपल्ली, टाकळी (ज.), मरखेल तांडा, दरेगांव या चार गावातील मजुरांनी दि. 21 मे पासून दोन आठवडे कृषी विभागामार्फत काम केले आहे. या मजुरांची एकूण संख्या 400 आहे. या मजुरांना काम देताना महिलांना रु. 25/- व पुरुषांना रु. 40/- मजुरी देऊ असे सांगण्यात आलेले असताना अद्यापर्यंत या मजुरांना पगार वाटप झालेले नाही. मजुरांनी यासंदर्भात चौकशी केली असता स्थानिक अधिकाऱ्यांकडून अद्याप वरुन पैसे आले नाहीत असे सांगण्यात येत आहे. मजुरांना तातडीने पगार होणे आवश्यक आहे. तसेच पगार वेळेवर का झाले नाहीत ? किमान वेतनाप्रमाणे मुरी दिली जाणार आहे काय ? असे अनेक प्रश्न उपस्थित होत असल्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MHM/

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी.

**तालिका सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेली शासकीय विधेयके पुढे ढकलण्यात आली आहेत.

सभागृहापुढील □म□ज संपलेले आहे. सभागृहाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ उद्या मंगळवार, दि□ां□ 18 जुलै, 2006 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□ः भरेल.

( सभागृहाची बैठ□ दुपारी 3 वाजू□ 41 मिि□टां□ी, मंगळवार, दि□ां□ 18 जुलै, 2006 च्या स□ाळी 11.00 वाजेपर्यं□ स्थगि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही